# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
## महाराष्ट्र राज्य, पुणे

रासनिप्रा

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे – ४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१ इमेल आयडी - sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/ कृ.उ.बा.स./निवडणूक प्रक्रिया सुरू करणे / ६७७८/२०२२. दिनांक:०८/०९/२०२२

**वाचले** :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२०, दिनांक १४.३.२०२०.

३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) (पहिली सुधारणा) नियम २०२०, दिनांक १६.४.२०२१.

४. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. ३०५८/सन २०२१, दिनांक ६.१०.२०२१.

५. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. ३३२७/सन २०२१, दिनांक २१.१०.२०२१.

६. मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्र. ११६६९/२०२१ मध्ये पारीत केलेला आदेश दिनांक १८.११.२०२१.

७. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. ४०४२/सन २०२१, दिनांक २२.११.२०२१.

८. या प्राधिकरणाकडील आदेश दिनांक १३.०९.२०२१, दिनांक ३०.०९.२०२१ व दिनांक २६.११.२०२१.

९. मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्र. ११६६९/२०२१ मध्ये दाखल दिवाणी अर्ज क्र.८४०३/२०२२ मध्ये पारीत केलेला आदेश दिनांक १०.०६.२०२२.

१०. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासन आदेश क्रमांक कृबास ०१२०/प्र.क्र.१९/२१-स दिनांक १९.०४.२०२२.

**प्रस्तावना** :-

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्याच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२० अनुसार कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ निवडणूकीमध्ये किमान १० आर क्षेत्र धारण करणाऱ्या शेतकऱ्यांऐवजी बाजार क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्राथमिक कृषि पतसंस्था/बहुद्देशीय सहकारी संस्था व ग्रामपंचायत सदस्यांना मतदानाचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र. ४ च्या आदेशानुसार ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाची मुदत दिनांक २३.१०.२०२१ रोजी अथवा त्यापूर्वी संपुष्टात आलेली आहे आणि ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर दिनांक २३.१०.२०२१ रोजी अथवा त्यापूर्वी प्रशासक नियुक्ती झालेली आहे, अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका सुरु केलेल्या होत्या. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र. ५ च्या आदेशानुसार ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाची मुदत दिनांक २३.१०.२०२१ नंतर संपुष्टात येणार आहे व ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर अशासकीय प्रशासक मंडळ / प्रशासक कार्यरत आहेत, परंतु प्राधिकरणाने यापूर्वी निर्गमित केलेल्या

दिनांक ०६.१०.२०२१ रोजीच्या आदेशामध्ये ज्या अशासकीय प्रशासक मंडळ / प्रशासक नियुक्त कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा समावेश झालेला नाही, अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका सुरु केलेल्या होत्या. आणि,

ज्या अर्थी, मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. ११६६९/२०२१ मध्ये वाचावे क्र. ६ चे आदेश पारीत करून निवडणूकीस पात्र विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणूका तातडीने पूर्ण करुन तदनंतर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूका सुरु करणेबाबत आदेशित केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, मा. उच्च न्यायालयाकडील वाचावे क्र.६ चे आदेश विचारात घेऊन प्राधिकरणाने वाचावे क्र. ४ व ५ चे आदेश वाचावे क्र.७ चे आदेशानुसार रद्द करून कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीकरीता प्रसिध्द करण्यात आलेला मतदार यादी कार्यक्रम रद्द केलेला आहे. तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणूकीनंतर निवडणूकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक प्रक्रिया सुरु करणे संदर्भात प्राधिकरणाकडून स्वतंत्र आदेश पारीत करण्यात येतील असे स्पष्ट केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र. ८ च्या आदेशानुसार जिल्हा निवडणूक आराखडयातील पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या टप्प्यातील दिनांक ३१.०३.२०२२ अखेर निवडणूकीस पात्र प्राथमिक कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया प्राधान्याने सुरु करणेबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. मात्र सदर संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत पूर्ण होणार नसल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. ११६६९/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिवाणी अर्ज दाखल करून प्राथमिक कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता चार महिन्यांची मुदतवाढ मिळणेबाबतची विनंती केली असता मा. उच्च न्यायालयाने वाचावे क्र. ९ चे आदेश पारीत करून प्राथमिक कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता दिनांक ३१.०८.२०२२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. मा.उच्च न्यायालयाने दिलेली मुदतवाढ संपूष्टात आलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, शासनाने वाचावे क्र. १० च्या आदेशानुसार दिनांक २२.०४.२०२२ नंतर ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाची नियमित मुदत व वाढीव मुदत संपुष्टात आलेली आहे अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर कलम १५ (क) अंतर्गत प्रशासकाची नियुक्ती करणेबाबत संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना निर्देश दिलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १५ क (१) (ख) मधील तरतुदीनुसार प्रशासकाने अधिकार पद ग्रहण केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीत संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीची निवडणूक घेणे अनिवार्य आहे. आणि,

ज्या अर्थी, राज्यातील १७९७५ निवडणूकीस पात्र प्राथमिक कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्थांपैकी १६२१६ प्राथमिक कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेल्या आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समितींच्या निवडणूका सुरळीपणे व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियमांच्या व नियमांच्या तरतुदींशी सुसंगत आदेश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्या अर्थी, प्राधिकरण निवडणूकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका सुरू करण्यासाठी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**-:: आदेश ::-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) व नियम ६ मधील परंतुकान्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन प्राधिकरण खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१. ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाची मुदत **दिनांक ३१.१२.२०२२ पर्यंत** संपुष्टात आलेली आहे / येणार आहे व ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर अशासकीय प्रशासकीय मंडळ / प्रशासक कार्यरत आहेत अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रिया सोबत जोडलेल्या **परिशिष्ट १** मधील मतदार यादी कार्यक्रम व निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे **दिनांक ०७.०९.२०२२ पासून** सुरू कराव्यात. तसेच निवडणूक प्रक्रिया सुरु न करणेबाबत मा.न्यायालयाचे विशिष्ट कृषि उत्पन्न बाजार समिती संदर्भात आदेश असल्यास अशा कृषि उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरु करु नयेत.
२. ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाची मुदत **दिनांक ३१.१२.२०२२ पर्यंत** संपुष्टात आलेली आहे / येणार आहे व ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांवर अशासकीय प्रशासक मंडळ / प्रशासक कार्यरत आहेत अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता आवश्यक असणाऱ्या प्राथमिक मतदार यादया **दिनांक ०१.०९.२०२२ या अर्हता** दिनांकावर तयार कराव्यात.
३. संपूर्ण मतदार यादी कार्यक्रम व निवडणूक कार्यक्रम प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर (https://scea.maharashtra.gov.in) प्रसिध्द करावा व कमीत कमी आकाराच्या संक्षिप्त मतदार यादी कार्यक्रमास व निवडणूक कार्यक्रमास जास्त खपाच्या एकाच स्थानिक वर्तमान पत्रात शासन मान्य दराने व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.
४. कोव्हीड १९ व तत्सम आजारा संदर्भात शासनाने घालुन दिलेल्या नियमांचे व मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे.
५. निवडणूकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याकरीता आवश्यकता असल्यास शासनाच्या इतर विभागातील समकक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.
६. सदरचे आदेश श्रीरामपूर, राहता, जाफ्राबाद, भोकरदन, वसमत व धारुर या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता लागू राहणार नाहीत.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

**सोबत-** मतदार यादी कार्यक्रम व निवडणूक कार्यक्रम

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे.

(डॉ.पी.एल.खंडागळे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (संबंधीत)

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (संबंधित)

**प्रत माहितीस्तव रवाना :-**

१. मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मा. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

## परिशिष्ट १

## कृषि उत्पन्न बाजार समितीचा संभाव्य मतदार यादी व निवडणूक कार्यक्रम

**मतदार यादी कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व गटविकास अधिकारी यांच्याकडून सदस्य सुची मागवणे. | २७.०९.२०२२ पर्यंत |
| २. | प्रारूप मतदार यादी तयार करण्याकरीता सदस्य सुची बाजार समिती सचिवाकडे सुपूर्द करणे. | ०३.१०.२०२२ |
| ३. | बाजार समिती सचिवाने नमुना ४ मध्ये प्रारूप मतदार यादी तयार करणे. | ०३.१०.२०२२ ते ३१.१०.२०२२ |
| ४. | बाजार समिती सचिवाने नमुना ४ मधील प्रारुप मतदार यादी जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स) यांच्याकडे सादर करणे. | ०१.११.२०२२ |
| ५. | जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स) यांनी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे. | १४.११.२०२२ |
| ६. | जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स) यांनी प्रारुप मतदार यादीवर आक्षेप/हरकती मागवणे. | १४.११.२०२२ ते २३.११.२०२२ |
| ७. | जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स) यांनी प्राप्त आक्षेप/हरकतींवर निर्णय घेणे. | २३.११.२०२२ ते ०२.१२.२०२२ |
| ८. | जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स) यांनी अंतीम मतदार यादी प्रसिध्द करणे. | ०७.१२.२०२२ |

**निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रम जाहिर करणे | २३.१२.२०२२ |
| २. | नामनिर्देशन करण्याचा शेवटचा दिनांक | २३.१२.२०२२ ते २९.१२.२०२२ |
| ३. | मिळालेल्या नामनिर्देशनपत्रांच्या यादीच्या प्रसिध्दीचा दिनांक | नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत जसजशी मिळतील त्याप्रमाणे |
| ४. | नामनिर्देशनपत्रांच्या छाननीचा दिनांक | ३०.१२.२०२२ |
| ५. | छाननीनंतर वैध नामनिर्देशनपत्रांच्या प्रसिध्दीचा दिनांक | ०२.०१.२०२३ |
| ६. | ज्या दिनांकापर्यंत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक | ०२.०१.२०२३ ते १६.०१.२०२३ |
| ७. | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्याचा व निशाण्याचे वाटप करण्याचा दिनांक | १७.०१.२०२३ |
| ८. | मतदान | २९.०१.२०२३ |
| ९. | मतमोजणी | ३०.०१.२०२३ |
| १०. | निकाल जाहिर करणे | मतमोजणी नंतर लगेचच |

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे. सत्यमेव जयते

(डॉ.पी.एल.खंडागळे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.